# मेट्रो ३ : ३ हजार झाडांच्या मूळ जागी वृक्षारोपण

## मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचा उपक्रम

मुंबई : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो ३ मार्गिकेच्या कामकाजादरम्यान बाधित झालेल्या झाडांचे वृक्षारोपण त्यांच्या मूळ जागी करण्याच्या मोहिमेला मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने अर्थात एमएमआरसीएलने सुरुवात केली आहे. एमएमआरसीएलच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांच्या हस्ते मूळ जागी वृक्षारोपण करण्याच्या अर्थात इन सिटू प्लान्टेशन मोहिमेचा शुभारंभ बुधवारी मेट्रो स्थानकांच्या इलेक्ट्रॉनिक्स प्रादेशिक चाचणी प्रयोगशाळा परिसरात करण्यात आला. या वेळी अब्दुल मोईद, संचालक, ईआरटीएल (पश्चिम), एस. के. गुप्ता, संचालक (प्रकल्प), ए. ए. भट्ट, संचालक (प्रणाली), आर. रमणा, कार्यकारी संचालक (नियोजन), राजीव, कार्यकारी संचालक (रोलिंग स्टॉक), राजीव कुमार, कार्यकारी संचालक (सिग्नल आणि दूरसंचार), सी. एम. जाधव, कार्यकारी संचालक (स्थापत्य) यांसह मुं.मे.रे.कॉ.चे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेदरम्यानच्या २६ स्थानकांमध्ये ३ हजार झाडे प्रभावित झाली होती. उच्च न्यायालयाच्या प्रतिज्ञापत्रानुसार एमएमआरसीएलने राज्यातील विविध बागांमध्ये १८ इंच परिघ असलेल्या झाडे मेट्रो स्थानकांच्या परिसरात मूळ जागी पुनर्स्थापित करण्यात आली आहेत. पॅकेज १९ अंतर्गत सिप्झ ते धारावीपर्यंतच्या १० स्थानकांच्या दरम्यान झाडांची रूजवात करण्यात आली असून, पॅकेज १९ अंतर्गत देशी बदाम, तर फुलांमध्ये ताम्हण आणि पांगिरा प्रजातींसह १७ स्थानिक प्रजातींची एकूण १०८५ झाडे लावली जाणार आहेत.

मूळ जागी वृक्षारोपण अर्थात इन सिटू प्लान्टेशन मोहिमेला सुरुवात केल्याने एमएमआरसीएलच्या वतीने पर्यावरणाचे संतुलन राखण्यास हातभार लावण्यात येणार असल्याचे सांगत व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी जवळपास ३ हजार झाडांची काळजी एमएमआरसीएलकडून घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.